स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (महाराष्ट्र)
विद्यावाचस्पती (पीएच्.डी. मराठी) पदवीसाठी
सादर करावयाच्या विषयाची रूपरेषा

संशोधन विषय

"दलित आत्मकथनातील निवडक स्त्री आत्मकथनातून येणारे पुरुष चित्रण व निवडक पुरुष आत्मकथनातून येणारेस्त्री चित्रण : एक चिकित्सक अभ्यास."[विशेष संदर्भ - १९८०ते२०१०]

संशोधक

होनवडजकर शिवमूर्ती कोंडीबाराव

गीता नगर देगलूर, जि. नांदेड.

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुरेशशिंदे

पदवी व पदव्युत्तर [मराठी विभाग प्रमुख]

शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर.

“ दलित आत्मकथनातील निवडक स्त्री आत्मकथनातून येणारे पुरुष चित्रण व निवडक पुरुष आत्मकथनातून येणारेस्त्री चित्रण : एक चिकित्सक अभ्यास.”[विशेष संदर्भ - १९८०ते२०१०]

प्रस्तावना -

भारतीय संस्कृतीला मोठ्या प्रमाणात साहित्याचा वारसा लाभलेला आहे. भारत हा जगातील एकमेव असा देश आहे जो की अतिप्राचीन आहे. प्राचीन काळापासून जगामध्ये भारताची ओळख‘विविधतेत एकता’ अशी आहे. इथेसंस्कृती भाषा आणि साहित्य यात सुद्धा विविधता असल्याचे दिसून येते. भारताला भाषेचा ऐतीहासिक वारसा लाभलेला असून इथे भाषिक विविधता असून विविध प्रादेशिक भाषा बोलल्या जातात. मूलत: भारतातील प्रत्येक राज्य हे भाषावार विभागलेले आहे. जसे की, महाराष्ट्र - मराठी, आंध्रप्रदेश - तेलगू, पश्चिम बंगाल - बंगाली, गुजरात - गुजराती, कर्नाटक - कन्नड, केरळ - मल्याळम, पंजाब - पंजाबी, तामिळनाडू - तमिळ इत्यादी.

भारतीय संस्कृतीच्या इतिहासातस्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यातील संघर्ष हा देखील एक अभ्यासाचा विषय आढळून आलेला आहे. भारतीय इतिहासात जातिव्यवस्था ही जवळपास तीनहजार वर्षापासून ऱ् ाात आहे. भारतीय हिंदूसमाजाची ओळखही जातिव्यवस्थेच्या संकल्पने शिवाय होऊ शकत नाही. कालांतराने हीच जातिव्यवस्था हिंदू लोकांच्या सामाजिक वर्तणुकीतूनच आढळून आली नाहीतर पुढे चालूनती त्यांच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक , इ. घटकावर सुद्धा राज्य करु लागली. अशा प्रकारे‘जात’हीहिंदूसमाजाची खरी ओळख बनत गेली. याच जातिव्यवस्थेने कालांतराने वेगळे वळण घेतले व त्यातुनच सवर्ण लोकांची उत्पत्ती झाली. या सवर्ण किंवा उच्चवर्णिय लोकांचा एक वेगळा गट निर्माण झाला व तेसमाजातील निम्न वर्गीय म्हणजेच खालच्या जातीतील शुद्र लोकांचा छळ करु लागले व यातुनच पुढे‘सवर्ण’ व ‘शुद्र’ या दोन गटामध्ये कधीही न मिटणारा संघर्ष निर्माण झाला.

कालांतराने हिंदू समाजातील ब्राह्मणांकडून दलितांची पिळवणूक हे एक नित्याचेसमीकरण बनत गेले. म्हणून यातून दलितांची मुक्ती करणेहा एक गहन प्रश्न निर्माण झाला. या सर्व अन्यायाविरुध्द वाचा फोडण्याण्यासाठीसमाजातील काही क्रांतिकारकसमाजसुधारकांनी पुढाकार घेतला. यात महात्मा बसवेश्वर, महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगे बाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. हा संघर्ष इतक्यावरच थांबला नाहीतर पुढे चालून यांची प्रेरणा घेऊन भारतातील दलितसमाजातीलसाहित्यिकांनी उदा - बाबुराव बागुल, दया पवार, शरणकुमार लिंबाळे, नामदेव ढसाळ, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, नरेंद्र जाधव, किशोर काळे, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, अर्मिला पवार, नजूबाई गावीत,सुनीता अरळीकर, ओमप्रकाश वाल्मिकी, कौसल्या बैसंती, अरविंद मालागट्टी, दलपत चौहान, डॉ.पी.सिध्दलिंगैया, पी.सिवकामी, बलवीर मधोपुरी इ. अनेक प्रांतातीलसाहित्यिकांनी आपल्या साहित्य लेखणीतून या छळवणुकी विरुध्द बंड पुकारले. अशा प्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या समता, न्याय आणि बंधुत्व या तत्वांचे अनुकरण करुन या सर्व लेखकांनी आपल्या साहित्यातून या अन्यायाविरुध्द बंड पुकारले.

मराठीसाहित्यातील नव्या प्रवाहांची नोंद घेतल्याशिवाय आपणास पुढे जाता येणार नाही. १९६० नंतर दलितसाहित्य, ग्रामीणसाहित्य, आदिवासी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य असे अन्य साहित्य प्रवाह प्राध्यान्याने मराठीसाहित्यात आले.

दलितसाहित्याचा प्रवाह मराठीत आला तो म.फुले, शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊनहा नवा प्रवाह आला.

दलितसाहित्यात प्रथम कविता आणि नंतर आत्मकथने आली. वाङ्.मयाच्या या दोन प्रवाहाने हेसाहित्य विकसित झाले आहे. कविता, आत्मकथने, कथा, कादंबरी, नाटक, समीक्षा आणि वैचारिक लेखन अशा क्रमाने दलितसाहित्यात कलाकृती सिध्द झाल्या.

दलितसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी मी“दलित आत्मकथनातील निवडक स्त्री आत्मकथनातून येणारे पुरुष चित्रण व निवडक पुरुष आत्मकथनातून येणारेस्त्री चित्रण : एक चिकित्सक अभ्यास” (विशेष संदर्भ - १९८०ते२०१०) हा कालखंड संशोधन करण्यासाठी निवडलेला आहे.

विषय निवडीचे प्रयोजन :

दलितसाहित्याच्या अनुषंगाने या अगोदर बऱ्याच संशोधकांनी दलितसाहित्यातसंशोधन केलेले आहे. तरी पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि वाड्.मयाचा पगडा बालपणापासून माझ्यावर राहिलेला असल्याने. मूलत: दलित समाजात माझा जन्म झालेला असल्यामुळे माझ्या समाजाचे झालेले शोषण आणि छळ माझ्या पुर्वजांनी अनुभवलेले अनुभव मी त्यांच्याकडून ऐकले व अनुभवले आहे. म्हणून दलितसाहित्य त्यातल्यात्यात दलित आत्मकथाहा माझा विशेष आवड असलेला विषय असल्याकारणाने मी"दलित आत्मकथनातील निवडक स्त्री आत्मकथनातून येणारे पुरुष चित्रण व निवडक पुरुष आत्मकथनातून येणारेस्त्री चित्रण : एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ - १९८०ते२०१०) हा कालखंड संशोधन अभ्यासाठी विषय निवडलेला आहे.

विषयाची उद्दिष्टे :-

मराठी दलित आत्मकथनांचासखोल अभ्यास करुन त्यातून येणारे दलित जीवनाचे वास्तव याचा आढावा घेणे. मराठी दलितस्त्री आत्मकथनातून येणारेस्त्री व पुरुष जीवनाचा अभ्यास करणे व दलितस्त्रीयांचा सामाजिक दर्जासुधारण्याचा प्रयत्न करणे. प्रस्तुत अभ्यासातून दलित समाजाला अगणित दारिद्रय आणि शक्तीहीनतेपासुन बाहेर पडण्यासाठी बळ देणे. दलितांच्या लिखाणातून त्यांच्या वेदना आणि जखमांवर मात करण्यासाठी अभ्यास करणे. दलित लेखकांच्या लिखाणाद्वारे त्यांच्यावर लादल्या गेलेल्या ढोंगी परंपरा, दुष्ट चालीरिती, अज्ञान, देवी - देवतांवरील अंधविश्वास इत्यादी वाईट प्रथांमधूनसुटका करणे. अशा प्रकारे या सर्व बाबींचा प्रस्तुतस्त्री व पुरुष दलित लेखकांच्या निवडक आत्मकथनाचा अभ्यास करणेहे या संशोधनाचे उद्दिष्ट आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :-

मराठी दलितसाहित्याचासखोल अभ्यास करुन दलित आत्मकथनांचे स्वरुप व परंपरा याचा आढावा घेऊन१९८०ते२०१० या कालखंडातील निवडक दलितस्त्री व पुरुष लेखक यांच्या आत्मकथनातून येणाऱ्या पुरुष व स्त्री चित्रणाचा अभ्यास करावयाचा आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करत असतांना मी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करणार आहे.

संशोधन विषयाचे महत्व :-

प्रस्तुतसंशोधन कार्याचे मुख्य उद्देशसकारात्मक समाज बांधणी करणेहेहोय. भारतासारख्या हजारो जातीमध्ये विभागलेल्या देशात सामाजिक ऐक्य प्रस्थापित करणेहा या अभ्यासाचा मूळ उद्देश आहे. ही एका माणसाची लढाई नसून दलितसमाजातील प्रत्येक घटकांची आहे. या अभ्यासातून दलितसमाजातील सर्वसामान्य दलितस्त्रीला न्याय मिळवून देणे व तिचा समाजातील दर्जा उंचावणे हा प्रयत्न आहे. तसेच पुरुष व स्त्री चित्रणाचा अभ्यास करुन हेसंशोधन पूर्णत्वास येणार आहे. म्हणून१९८०ते२०१० या कालखंडातील निवडक स्त्री व पुरुष लेखकांच्या आत्मकथनातील पुरुष व स्त्री चित्रणाचा चिकित्सक अभ्यास करणेहा माझ्या संशोधनाचा मूळ गाभा आहे.

प्रकरणांची वर्गवारी

प्रकरण पहिले

१) दलितसाहित्याचे स्वरुप व संकल्पना :-

प्रस्तुत प्रकरणात मराठीसाहित्याचा थोडक्यात आढावा व मराठी दलितसाहित्याचा आढावा घेऊन जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, समाज सुधारकांचे योगदान या संदर्भात अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण दुसरे

२) आत्मकथा स्वरूप आणि संकल्पना :-

प्रस्तुत प्रकरणात आत्मकथा या शब्दाची उत्पत्ती, व्याख्या, मराठीसाहित्यात आत्मकथनाची सुरुवात, आत्मकथनाचे स्वरुप, प्रेरणा व संकल्पना तसेच निवडक दलितस्त्री व पुरुष आत्मकथाकारांचे जीवन चरित्र व त्यांचेसाहित्यातील योगदान याचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण तिसरे

३) निवडक दलितस्त्री लेखिकांच्या आत्मकथनातून येणारे पुरुष चित्रण :-

प्रस्तुत प्रकरणात निवडक दलितस्त्री लेखिकांच्या आत्मकथनातून येणारे समजाजीवन, कुटुंबव्यवस्था, राहणीमान, नातेसंबंधातील पुरुष चित्रणाचा विशिष्ट पध्दतीने अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे

४) निवडक दलित पुरुष लेखकांच्या आत्मकथातून येणारेस्त्री चित्रण :-

प्रस्तुत प्रकरणात निवडक दलित पुरुष लेखकांच्या आत्मकथनातून येणारे समाजजीवन, कुटुंबव्यवस्था, राहणीमान व नातेसंबंधातील स्त्री चित्रणाचा विशिष्टपध्दतीने अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे

५) निवडक दलितस्त्री आणि पुरुष लेखकांच्या लेखनातील साम्य आणि भेद:-

प्रस्तुत प्रकरणात निवडक आत्मकथनातूनस्त्री आणि पुरुष लेखकांच्या लेखन शैलीतील साम्य आणि भेद याचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण सहावे

६) निवडक दलितस्त्री आणि पुरुष लेखकांच्या आत्मकथनाची भाषाशैली :-

प्रस्तुत प्रकरणात निवडक दलितस्त्री आणि पुरुष लेखकांच्या आत्मकथनातील भाषा शैलीचा अभ्यास करणार आहे.

प्रकरण सातवे

७) उपसंहार :-

प्रस्तुतसंशोधनात वरील निवडक दलित लेखक व लेखिकांच्या आत्मकथनातून स्त्री व पुरुष चित्रणाचा चिकित्सक अभ्यास करणार आहे. माझ्या संशोधनात अभ्यासानुसार प्रकरणामध्ये बदल केला जाईल.

विशेष संदर्भ १९८० ते २०१०

निवडक स्त्री आत्मकथन :

१)	शांताबाई कांबळे	-	माझ्या जल्माची चित्तरकथा
२)	बेबी कांबळे	-	जिण आमुचं
३)	नजुबाई गावित	-	अदोर
४)	उर्मिला पवार	-	आयदान
५)	सुनिता आरळीकर	-	हिरकणीचं बिऱ्हाड

निवडक पुरुष आत्मकथन :

१)	शरणकुमार लिंबाळे	-	अक्करमाशी
२)	किशोर काळे	-	कोल्हाटयांच पोर
३)	नरेंद्र जाधव	-	आमचा बाप आन् आम्ही
४)	लक्ष्मण माने	-	उपरा
५)	लक्ष्मण गायकवाड	-	उचल्या

संदर्भसूची

१) डॉ.योगेश मेश्राम - दलितसाहित्य उद्‌गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन , नागपूर.

२) दत्ता भगत - दलितसाहित्य दिशा आणि दिशांतर, अभय प्रकाशन, नांदेड.

३) शरणकुमार लिंबाळे - भारतीय दलितसाहित्य, साहित्य अकादेमी.

४) अर्जुन डांगळे - दलितसाहित्य : एक अभ्यास, सुगावा प्रकाशन : पुणे३०.

५) भालचंद्र फडके - दलितसाहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

६) यशवंत मनोहर - दलितसाहित्य सिध्दान्त आणि स्वरुप, प्रबोधन प्रकाशन, नागपूर.

७) प्रभाकर मांडे - दलितसाहित्याचे निराळेपण, धारा प्रकाशन, औरंगाबाद.

८) डॉ.मनोहर जाधव - दलितस्त्रियांची आत्मकथने: स्वरुप आणि चिकित्सा, सुविधा प्रकाशन

९) लक्ष्मण माने - उपरा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

१०) नरेंद्र जाधव - आमचा बाप आन् आम्ही, ग्रंथाली प्रकाशन.

११) नजूबाई गावीत - आदोर.

१२) बेबी कांबळे - जिणं आमुचं, रचना प्रकाशन पुणे.

१३) प्रल्हाद जी. लुलेकर, - मराठवाडयातील साहित्य. सतीश बडवे

१४) डॉ.चिंतामण कांबळे - दलित साहित्य (चर्चा - चिंतन - समीक्षा) कस्तुरी प्रकाशन.

१५) अनिलकुमारसुपडू पगारे - दलितसाहित्य प्रेरणाविष्कार अथर्व पब्लिकेशन , जळगाव.

१६) डॉ. शशिकांत साळवे, प्रा.संदीप चपटे - दलितसाहित्याचे वेगळेपण, शब्दश्री प्रकाशन, जुन्नर.

संशोधक

होनवडजकर शिवमूर्ती कोंडीबाराव
गीता नगर देगलूर, जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुरेशशिंदे
(मराठी विभाग प्रमुख)
शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर